VOL- XII ISSUE- VIII AUGUST 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी व आव्हाने

**प्रा. अनुराधा संजय कुरडे**
सहा.प्राध्यापक
जयक्रांती कॉलेज ऑफ एज्युकेशन, लातूर

**प्रस्तावना -**

राष्ट्रासमोर असणाऱ्या आव्हानांस सामोरे जाण्यासाठी मनुष्यबळ हे सर्वात महत्त्वपूर्ण संसाधनआहे. याचाच अर्थ राष्ट्रातील नागरिक सक्षम असतील तर ते राष्ट्रासमोरील आव्हानांचे रुपांतर संधीमध्ये करु शकतील. त्यामुळे राष्ट्रातील नागरिकांना सक्षम बनविणे अत्यंत महत्त्वाचेआहे. यासाठी एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपले स्वतंत्र असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवत असते. भारतातील सर्वात पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ साली तर दुसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ साली राबविण्यात आले. याच धोरणात १९९२ साली काही सुधारणा करण्यात आल्या. मात्र त्या आजपर्यंत अंमलात आणल्या जात आहेत. मागील ३४ वर्षांपासून राष्ट्राच्या शिक्षण धोरणामध्ये अमुलाग्र असा बदल झालेला दिसून येत नाही याउलट देशाच्या व नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक गरजा मात्र वेगाने बदलत आहेत. यातूनच राष्ट्रासमोर अनेक आव्हाने आणि संधी निर्माण होत आहेत. भविष्यातील या आव्हानांना, समोरे जाण्यासाठी आणि येणाऱ्या संधींचा उपयोग करून घेण्यासाठी राष्ट्रातील नागरिकांना कुशल बनवणे अत्यंत गरजेचे आहे.या बाबी लक्षात घेवुन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मांडणी करण्यात आली आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण 2020 अंमलबजावणी रूपरेषा:-**

नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये आपल्याला या 484 पृष्ठांचा मसुदा आराखडा 31 मे 2019 रोजी सादर केला त्यावर विचार विनिमय करून सुधारणा सुचविण्याची सहभागीदारांना संधी दिली आलेल्या सूचनांच्या विचारांतील 66 पृष्ठांच्या धोरणाच्या दस्तऐवजाला 29 जुलै 2020 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मान्यता मिळाली.

**शालेय शिक्षणाचा नव्याने तयार केलेला स्तर**

| स्तर | वयोगट (वय वर्ष) | इयत्ता |
|---|---|---|
| पायाभूत | ३ ते ८ | बालवाटिका (१, २, ३) पहिली, दुसरी |
| पूर्वतयारी | ८ ते ११ | तिसरी, चौथी आणि पाचवी |
| पूर्व माध्यमिक | ११ ते १४ | सहावी, सातवी आणि आठवी |
| माध्यमिक | १४ ते १८ | नववी, दहावी, अकरावी आणि बारावी |

या शै. धोरणामध्ये एकूण चार विभाग केलेले आहेत.

1) शालेय शिक्षण
2) उच्चशिक्षण
3) लक्ष करावयाचे इतर काही मुद्दे
4) प्रत्यक्षात धोरण अंमलबजावणी होण्यासाठीच्या बाबी

उपरोक्त व चार विभागात मांडणी करण्यात आलेल्या धोरणाच्या दस्तऐवजामध्ये शिक्षणात होणाऱ्या बदलांचे एकत्रित प्रतिबंध पहावयास मिळते. नवीन शिक्षण धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना ते कुठेही राहत असले तरीही दर्जेदार शिक्षण व्यवस्था पुरवली पाहिजे आणि उपेक्षित वंचित व अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे.

1) सर्वांना सहज शिक्षण
2) समता
3) गुणवत्ता
4) परवडणारे शिक्षण
5) उत्तरदायित्व

या पाच मूलभूत स्तंभ व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आधारित आहे.

**NEP 2020 ची उद्दिष्टे: -**

1) सर्वांगीण शिक्षण देणे
2) विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशीलता सर्जनशीलता व नैतिक मूल्य विकसित करणे.
3) भारताला ज्ञानसत्ताक बनवणे.
4) शिक्षण क्षेत्रात वाढती स्पर्धा गुणवत्ता व जागतिक दर्जा प्राप्त करणे.

**नवीन शैक्षणिक धोरण NEP 2020 ची वैशिष्ट्ये:-**

1) **मातृभाषेत शिकवणे :-** पाचवी पर्यंत शिक्षण मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत देण्याचा प्रयत्न. उदा. मराठी शाळेमध्ये मराठीत शिकवले जाईल.
2) **नवीन गोष्टी शिकायला मिळतील :-** कोडींग, शेती, हस्तकला, गायन, नृत्य, नाट्य, सहावी पासून मुलांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव.
3) **आपल्या आवडीनुसार विषय :-** आता विद्यार्थी स्वतःच्या मनावर कोणताही विषय निवडू शकतो. उदा. गणित, संगीत ,इतिहास.
4) **नवीन परीक्षा पद्धत :-** नवीन धोरणानुसार फक्त पाठांतरावर नाही तर विचार करण्याच्या शक्तीवर परीक्षा, मुलाचे ज्ञान सर्जनशीलता व्यवहारिक समाज पाहिली जाते.
5) **शाळांना थोडं स्वातंत्र्य :-** शाळांना त्यांच्या विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार काही निर्णय घेता येतील. उदा. स्थानिक विशेष शिकविणे वेळापत्रक बदलणे.
6) **शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण :-** शिक्षकांना नव्या तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा हे शिकवलं जातं चांगल्या शिक्षकांची निवड दर्शकपणे होते.
7) **गरीब व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मदत :-** ज्या मुलांना विशेष गरज आहे त्यांना ऑडिओ बुक्स सहाय्यक शिक्षक सुलभ साधने दिली जातात.
8) **उच्च शिक्षणामध्ये खालील बदल झालेले आहेत :-** एकाच विद्यापीठात सर्व विषय, चार वर्षाचा डिग्री कोर्स, अनेक वेळा प्रवेश मुभा
9) **विदेशी विद्यापीठांना भारतात शिक्षण सुरू करू देणे :-** नवीन धोरणानुसार मोठी पद्धत शाखा उघडू शकतात. त्यामुळे भारतातच चांगलं शिक्षण मिळू शकत.

**अंमलबजावणीत येणारी आव्हाने :**

या शै. धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सध्याच्या परिस्थितीत पुढील आव्हाने प्रामुख्याने जाणवतात.

1) **सर्व ठिकाणी तंत्रज्ञानाची सुविधा नाही :-** अनेक गावांमध्ये इंटरनेट मोबाईल संगणक स्मार्ट टीव्ही नाही. त्यामुळे ऑनलाइन शिक्षण अडथळ्याचे होते.
2) **शिक्षकांची कमतरता :-** काही शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी आहे. काही शिक्षकांना नवीन पद्धती माहित नाहीत.
3) **शिकवण्याच्या जुन्या पद्धती :-** काही ठिकाणी अजूनही जुन्या पद्धतीने शिकवले जातात. नवीन पद्धती स्वीकारला वेळ लागतो.
4) **आर्थिक अडचणी :-** नवीन साधना प्रशिक्षण डिजिटल शाळांसाठी खूप पैसा लागतो. काही राज्यांमध्ये निधी कमी आहे.
5) **पालक व समाजाचे अनभिज्ञता (माहिती नसणे) :-** काही पालकांना NEP बद्दल माहितीच नाही. त्यामुळे ते सहकार्य करत नाहीत.
6) **भाषेचे प्रश्न :-** काही ठिकाणी मातृभाषा व शिक्षणाची भाषा वेगळी असते. त्यामुळे मुलांना समजण्यात अडचण येते.
7) **विषय निवडताना गोंधळ :-** विद्यार्थ्यांना आवडते विषय निवडा किंवा आहे पण मार्गदर्शन असल्यास गोंधळ होतो.
8) **प्रशिक्षणासाठी वेळ व मनुष्यबळ :-** सर्व शिक्षकांना एकाच वेळी प्रशिक्षण देणे शक्य होत नाही. शाळांमध्ये तेव्हा शिकवण थांबते.
9) **शहरी व ग्रामीण भागात फरक :-** घरात सुविधा चांगल्या आहेत. गावामध्ये साधने, शिक्षक, इंटरनेट यांची कमतरता आहे.
10) **सर्व शाळांसाठी समान धोरण लागू करणे कठीण :-** भारतात अनेक प्रकारच्या शाळा आहेत (सरकारी, खाजगी, झोपडपट्टीत,आश्रम शाळा) सगळ्यांना शिकवणे अवघड जाते.
11) **विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत बदल करणे कठीण :-** अनेक विद्यार्थी परीक्षा गुणांसाठी देतात. NEP विचार, समज, कौशल्य यावर भर देते ही सवय लागायला वेळ लागतो.

12) **मुलांना विचार करायला शिकवणे ही नवी पद्धत आहे:-** पूर्वी पाठांतरावर भर होता. आता विचार समज सर्जनशीलता यावर भर हे शिकवायला शिक्षकांना वेळ लागतो.

अशा प्रकारची आव्हाने नवीन शै. धोरण 2020 मुळे निर्माण झालेली आहेत. याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे आहे.

**समारोप :-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शैक्षणिक इतिहासातील एक क्रांतिकारी पाऊल आहे. मातृभाषेतील शिक्षण, कौशल्याधारित, अभ्यासक्रम,संशोधनाची गरज, शिक्षकांचे सक्षमीकरण, डिजिटल शिक्षकांना चालना अशा विविध पैलूंनी हे धोरण शिक्षण क्षेत्राला नवीन दिशा देते. NEP 2020 हे भारतातील शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडविणारे धोरण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगली गुणवत्ता, लवचिकता, कौशल्य व जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता मिळणार आहे हे धोरण विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी एक मोठे पाऊल आहे.

भारतीय शिक्षणामध्ये येणारे स्थित्यंतरे विचारात घेता हे नवीन शैक्षणिक धोरण अत्यंत महत्त्वाचे वाटते. या धोरणामध्ये अंतर्भूत केलेली उद्दिष्टे आपण लक्षात घेतले तर शिक्षणाचा सर्वांगीण बदल करण्याचा मानस आपणाला दिसून येईल.या शैक्षणिक धोरणामध्ये प्रमुख गोष्ट म्हणजे या धोरणाने भारतीय शिक्षणाचा आकृतीबंध बदलण्याचा प्रयत्न होत आहे व या बदलांमध्ये बालकांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून शिक्षणाची होणारी सुरुवात सांगण्यात आली आहे जी पूर्वी सहा वर्ष होती. असा बदलणारा आकृतीबंध निश्चितच बालकांचा सर्वांगीण विकास करण्यास उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

शिक्षण व्यवस्थेतील हा बदल प्रत्यक्षात आणण्यासाठी यामध्ये सर्व घटकांचा सक्रिय सहभाग असेल तरच खालील आव्हाने पेलली जातील हे अधोरेखित करावे लागेल. ही आव्हाने पेलण्यासाठी सक्षम शिक्षक, सक्षम पालक व सक्षम व्यवस्था निर्माण केली तरच ही आव्हाने पार करता येतील व शै. धोरण यशस्वी होण्यास मदत होईल.

**संदर्भ :-**

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
2. नवीन शैक्षणिक धोरण माहिती पुस्तिका
3. NEP 2020
4. Weblinks: -
5. https://www.education.gov.in
6. https://www.cyberschoolmanager.com